दिनांक : १५ एप्रिल २००७

**प्रिय समन्वयक,**
**MS-CIT अधिकृत प्रशिक्षण केंद्र**

**विषय : एप्रिल २००७ बॅचच्या प्रवेशातील यश व मला पडलेले प्रश्न !**

सस्नेह नमस्कार,

MS-CIT एप्रिल २००७ अभ्यास सत्राला महाराष्ट्राच्या सर्व भागातील संगणक जिज्ञासू विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दिलेल्या उदंड प्रतिसादाने आपण MKCL कुटुंबातील सर्वजण भारावून गेलो आहोत. आपल्या या तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यास समर्पक असे शब्दच सापडत नाहीत अशीच आज आपणा सर्वांची स्थिती आहे. आपण सर्वांनी केलेल्या अथक परिश्रमाचे एकदिलाने, एकजुटीने केलेल्या टीमवर्कचे व आपल्या माजी विद्यार्थ्यांनी घरोघर पोहोचवलेल्या MS-CIT विषयक सकारात्मक संदेशाचे हे फलित आहे असे मी मानतो.

ज्ञान-प्रधान संस्कृतीकडे आपल्या समाजाला वेगाने घेऊन जाणा-या काळाचाही महिमा या यशाला कारणीभूत आहे हेही आपण विसरता कामा नये.

ज्ञानाधिष्ठित उद्योग, ज्ञानाधिष्ठित व्यवसाय, ज्ञानाधिष्ठित सेवाक्षेत्र, ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था यांचा जमाना वेगाने येत आहे व त्यात भारत अग्रेसर असणार आहे. आपल्या पाल्याचे भवितव्य अशा नव्या भारतात उज्ज्वल करण्यासाठी तो / ती लवकरात लवकर माहिती-तंत्रज्ञान साक्षर झाला / झाली पाहिजे ही जाणीव शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागातील समंजस पालकांमध्ये मोठया प्रमाणावर रुजत आहे. ज्ञानाधिष्ठित युगधर्माचा पालकांवरील हा प्रभावही आपल्या सध्याच्या व्यावसायिक यशाला बळकटी देत आहे. या बदलत्या काळाबरोबर, बदलत्या समाजमानसाबरोबर आपण सतत बदलत आहोत व या बदलाला यथाशक्ती दिशा देत आहोत हे आपल्या सध्याच्या यशाचे रहस्य आहे.

या ‘न भूतो’ अशा यशाबद्दल परस्परांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत असताना व आनंदोत्सव साजरा करीत असताना, आपल्यावर उदंड विश्वास व्यक्त करणा-या लक्षावधी विद्यार्थ्यांना अपार प्रेमाने व पराकोटीच्या समर्पित भावनेने उत्कृष्ट सेवा देण्यासाठी आपण कटिबध्द होऊया.

आपल्या परिवारातील काही केंद्रे विद्यार्थ्यांसाठी ज्या चांगल्या गोष्टी करतात त्या सर्वच्या सर्व चांगल्या गोष्टी आपल्या सर्वच्या सर्व केंद्रांवर रोजच्या रोज आपण करु शकू का ? उदाहारणादाखल काही गोष्टी बघूया.

- प्रवेशाबद्दल विद्यार्थ्यांचे / विद्यार्थिनींचे आभार मानून संगणक साक्षरतेविषयी त्याला / तिला शुभेच्छा देऊन अभ्यासक्रमाच्या पहिल्या दिवशी – ‘२३ एप्रिलला – अमुक वाजता आम्ही तुमची आमच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रात वाट पहात आहोत’ अशा आशयाचे, ‘पर्सनल टच’ असलेले व आपल्या केंद्राची वैशिष्टये समजावून सांगणारे स्वागत-पत्र / वेलकम लेटर (उत्कृष्ट गुणवत्तेचे डिटीपी केलेले व शुध्दलेखन विषयक एकही चूक नसलेले) आपण प्रत्येक विद्यार्थ्याला

पाठवू शकू ? त्यात त्याला मार्गदर्शन करणा-या OnCeT प्रमाणित शिक्षक / शिक्षिकेचे नाव व संक्षिप्त परिचय समाविष्ट करु शकू ?

- भारनियमनावर मात करुन विद्यार्थ्यांना दिलेले रोज २ तास प्रशिक्षणाचे अभिवचन पाळण्यासाठी आमच्या केंद्राचा डिझेल जनरेटर सदैव सज्ज आहे, अशा आशयाचा कायम-स्वरुपी फलक आपल्याला आपल्या केंद्राच्या दर्शनी भागात लावता येईल ?

- आपल्या केंद्रातील सर्व्हर, लॅन, हब, यूपीएस, बॅटरीज, सर्व संगणक, त्यावरील सॉफ्टवेअर, कीबोर्डस्, मॉनिटर्स, माऊस, माऊस पॅडस्, टेबल्स्, खुर्च्या, फळे, दिवे, पंखे, जिने, पाय-या, स्वच्छतागृहे, इ. विद्यार्थी- विद्यार्थिनी वापरणार असलेल्या सर्व गोष्टी आपण स्वत:(आपल्या कर्मचारी वर्गाने नव्हे !) आगाऊ वापरुन पाहू शकाल ? विद्यार्थ्याला त्यात काय अडचणी येतील ह्याचा स्वानुभव आधी घेऊ शकाल ? त्यातील दोष आधी पूर्ण दुरुस्त होऊ शकतील?

- आपल्या केंद्रातील वर्गखोली व संगणक प्रयोगशाळा आकर्षक करण्यासाठी एखाद्या इंटिरियर डिझायनरच्या किंवा आर्किटेक्टच्या कल्पनाशक्तीचा / कलात्मकतेचा लाभ घेता येईल ? आपले केंद्र अधिक विद्यार्थी सम्मुख व सुशोभित करुन त्यातील वातावरण अर्थशक्तीपेक्षा कल्पनाशक्तीच्या जोरावर अधिक प्रसन्न बनविता येईल ? त्यातून आपल्या केंद्राची एक खास ‘ब्रँड-इमेज’ विद्यार्थ्यांना सादर करता येईल ?

- केंद्रातील दैनंदिन स्वच्छता, देखभाल (मेंटेनन्स्), इ. कडे लक्ष देण्यासाठी आपण स्वत: (आपले कर्मचारी नव्हे ! ) जातीने पंधरा मिनिटांची गुंतवणूक रोज सकाळी न कंटाळता करु शकाल ? रोज झिरो-डिफेक्ट सेवेसाठी आपण सर्व तयार आहोत ? केंद्रातील सुविधा योग्य पध्दतीने कार्यान्वित आहेत की नाही हे रोज तपासण्यासाठी आपली स्वत:ची मेंटेनन्स चेकलिस्ट तयार आहे ?

- आपल्या केंद्रात रोज येणा-या विद्यार्थ्याचे / विद्यार्थिनीचे स्वागत प्रसन्न स्मितहास्याने (ख-याखु-या सप्रेम स्मितहास्याने, वरवरच्या, यांत्रिक, कृत्रिम स्मितव्यवहाराने नव्हे) होण्याची संस्कृती आपण रुजवू शकू ? विद्यार्थ्यांचा शिकण्याचा आत्मविश्वास शतगुणित करण्यासाठी, जागतिक स्तरावर अगदी अपरिचित व्यक्तीला सामोरे जातानासुध्दा स्वीकारली गेलेली ही सहजसाध्य सुसंस्कृती आपण सर्व आपल्या विद्यार्थ्यांसाठी कायमची आत्मसात करु शकू ?

- विद्यार्थ्यांचा अभ्यासवर्ग रोज फलकावरील एखाद्या सुविचाराने / सुभाषिताने सुरु होऊ शकेल?

- अभ्यासवर्ग संपताना रोज एखादा विनोद, एखादे व्यंगचित्र, एखादे हास्यचित्र, एखादे कोडे, एखादी कविता, एखादा शेर, एखादी छोटी बोधकथा/नीतीकथा , एखादी कलाकृती आपण विद्यार्थ्यांबरोबर शेअर करु शकू ? सामुहिक आस्वाद घेऊ शकू ? (आपण सर्व केंद्रांनी यासंबंधीची आपली एक दिवसाची पूर्वतयारी इतर सर्व केंद्रांशी शेअर केल्यास किमान दहा वर्षांचे साहित्य पहिल्याच दिवशी तयार होईल !)

- रोजचा अभ्यासवर्ग ठरलेल्या वेळेपेक्षा एकही मिनिट उशीरा सुरु होणार नाही व उशीरा संपणार नाही याची काळजी घेऊ शकू  ? विद्यार्थ्यांमध्येही वक्तशीरपणाची सवय रुजवू शकू. ठराविक वेळेपूर्वी एक मिनिट आपले शिक्षक वर्गात / संगणक प्रयोगशाळेत उपस्थित होऊ शकतील ?

- आपले शिक्षक आठवणीने प्रत्येक विद्यार्थ्याला- विद्यार्थिनीला त्याच्या / तिच्या पहिल्या नावाने संबोधू शकतील ?

- आपल्या केंद्रामध्ये येणारे विद्यार्थी / विद्यार्थिनी विविध धर्मांचे, जातींचे, सांप्रदायिक श्रध्दा बाळगणा-या समाज घटकांचे, भाषिक व प्रादेशिक घटकांचे असतात याची जाणीव ठेवून या सर्वांना आपलेसे वाटेल असे धर्म, जाती, संप्रदाय, भाषा, प्रदेश-निरपेक्ष वातावरण आपल्या केंद्रात ठेवता येईल ?  विशिष्ट धर्माचे, प्रांतांचे सण केंद्रात साजरे करणे व इतर धर्माच्या, प्रांतांच्या (विशेषत: अल्पसंख्यांकांच्या) सणाविषयी अनभिज्ञता / औदासिन्य टाळून तसेच, अनावधानाने येणारे धर्मवाचक, जातीवाचक, भाषा-प्रदेशवाचक पूर्वग्रहदूषित उल्लेख टाळून एक मोकळे, सहिष्णू व सद्‌भावनापूर्ण असे एकविसाव्या शतकाला साजेसे व सर्वांचा सारखाच आदर करणारे निकोप वातावरण आपल्या केंद्रात रुजवता येईल ?

- आपल्या केंद्रामध्ये येणा-या, माहिती तंत्रज्ञान शिकण्यासाठी धडपडणा-या आणि यातूनच पुढे आपल्याला उपजीविकेचे साधन मिळेल असा दुर्दम्य आशावाद बाळगणा-या अपंग विद्यार्थी / विद्यार्थिनींना ते शिक्षणक्रमात इतर सर्व विद्यार्थ्यांच्या मागे नाहीत, बरोबरच आहेत ; किंबहुना पुढेही जाऊ शकतात असे त्यांना मनोमन वाटेल यासाठी आपल्याला त्या त्या विद्यार्थ्याचे विशिष्ट अपंगत्व लक्षात घेऊन विशेष प्रयत्न करता येतील ?

- आपल्या केंद्रामध्ये येणा-या विद्यार्थिनींबरोबर (मुली व प्रौढ महिला), शिक्षिकांबरोबर, सहाय्यिकांबरोबर त्यांचा आत्मसन्मान अबाधित राहील व त्यांना सुरक्षित वाटेल असे नैतिक वर्तन आपल्या सर्व सहका-यांकडून होत राहील ?

- प्रत्येक विद्यार्थी अभ्यासाच्या / आकलनशक्तीच्या ज्या कुठल्या पातळीवर असेल तेथून पुढे विकसित होण्यासाठी त्याच्या शिक्षकांनी त्याला त्याच्या शिकण्यातल्या विशिष्ट अडचणी समजून घेऊन आपलुकीने मार्गदर्शन केल्यास व पुढे शिकण्यास सतत स्फूर्ती व उत्तेजन देत राहिल्यास तो प्राविण्याची उच्च पातळी गाठू शकतो, ह्या शिक्षणशास्त्रातील सर्वमान्य सिध्दांताची प्रचिती घेण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू शकू ?

- कमी वेगाने शिकणारे विद्यार्थीसुध्दा कदाचित त्यांच्या शाळेत मागे पाडले गेले असले तरी आपल्या केंद्रातील संवेदनशील आपुलकीच्या शैक्षणिक वातावरणात माहिती तंत्रज्ञानात पारंगत होऊ शकतात हे त्यांच्या पालकांना दाखवून देण्याची जी संधी आपल्याला मिळाली आहे त्याचे सोने करु शकू ?

- प्रत्येक विद्यार्थी अभ्यास करताना जे लहान मोठे यश मिळवेल किंवा चुका करेल त्या प्रत्येकवेळी त्याच्या यशापयशाला विशेष महत्व न देता त्यामागचे त्याने जे प्रयत्न केले असतील त्यांचे सतत कौतुक करण्याची व विद्यार्थ्यांभोवती कौतुकाचा, त्यांचे मनोधैर्य व आत्मविश्वास वाढवणारा Wow Effect तयार करु शकू ? – Wow ! You tried so well!! – अशा “Wow

Effect” ने केंद्रातील शैक्षणिक वातावरण सतत भारलेले ठेवण्याचे प्रयत्न करता येतील? (Wow effect ही शिक्षणक्षेत्राला मानसशास्त्राने दिलेली महान देणगी आहे.)

- प्रत्येक विद्यार्थी वेगळा आहे. त्याची बलस्थाने इतर विद्यार्थ्यांपेक्षा भिन्न आहेत ह्या नैसर्गिक सत्याचे भान ठेवून कधीही कुठल्याही विद्यार्थ्याची दुस-या कुठल्याही विद्यार्थ्याबरोबर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे तुलना न करण्याचा संयम राखता येईल ?

- आपल्या सुमारे तीन महिन्यांच्या सत्रात विद्यार्थ्यांचे सांघिक खेळ, छोटी सहल, अभ्याससहल, संगणक गप्पा, एनकार्टा दर्शन, दिवसाआड १० मिनिटांची इंटरनेट सफर, विविध-गुणदर्शन कार्यक्रम, अंताक्षरी, इ. सारखे सांस्कृतिक उपक्रम, व्यवसाय / करीयर मार्गदर्शन शिबीर, पालक मेळावा व  त्यात पाल्यांनी संगणकावर केलेल्या विविध उपक्रमांचे पालकांना सादरीकरण, तीन-तीन विद्यार्थ्यांच्या गटांनी संगणकावर करण्याचे MS-CIT अभ्यासक्रमासंबंधीचे छोटे-छोटे प्रकल्प व त्या प्रकल्पांचे वर्गापुढे सादरीकरण करण्याची प्रत्येक टीमला ५ मिनिटांची संधी व प्रत्येक सादरीकरण करणा-या टीमचे शिक्षकांकडून रसग्रहण व कौतुक, एखाद्या दिवशी निवडक विद्यार्थ्यांना आपले केंद्र चालविण्याची व त्यात वर्ग व संगणक प्रयोगशाळेत एखादा पाठ शिकविण्याची संधी, इ. विविध उपक्रमांचा भरगच्च खजिना व्यवस्थित व नियोजनबध्दरीतीने विद्यार्थ्यांपुढे वेळापत्रकासह ठेवून त्यात विद्यार्थ्यांचा मनोमन सहभाग मिळवून आपल्या केंद्रातील शैक्षणिक पर्यावरण एकसुरी व बोअरींग न ठेवता आनंददायी व आकर्षक बनवता येईल ?

- विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा त्यांना स्वत: शिकण्याच्या अनेक संधी रोजच्या वर्गात व संगणक प्रयोगशाळेतील पाठ्यक्रमात नियोजनबध्द पध्दतीने उपलब्ध करुन देता येतील ? माहिती तंत्रज्ञानात शिकविण्यापेक्षा स्वत: खटपट करुन शिकण्याला अधिक वाव व महत्व आहे असे आपल्याला मनोमन वाटते ?

- यादृष्टीने रोजचे सत्र संपवताना विद्यार्थ्यांना MS-CIT पुस्तकातील विशिष्ट पाने वाचून येण्यास सांगता येतील ? त्या पानांतील मजकुरावर आधारलेले प्रश्न वर्ग सुरू करताना विचारता येतील ? अचूक उत्तर देणा-या विद्यार्थ्याला १ रुपयाचे बक्षीस देऊन शाबासकी देता येईल  ? चुकीचे उत्तर देणा-या विद्यार्थ्याला पूरक प्रश्न विचारुन- विचारुन योग्य उत्तराकडे नेता येईल ?  तसा तो आल्यास त्याची शिकण्याची प्रक्रिया सेलिब्रेट करून त्यालाही १ रुपयाचे बक्षीस व शाबासकी मिळू शकेल ?

- इंटरनेट-टू, स्पीच रिकग्निशन, डिजीटल व्हिडीओ एडिटींग, वेअरेबल कंप्यूटर्स, इलेक्ट्रॉनिक भाषांतर ,ब्लू-रे तंत्रज्ञान व प्लॅस्टीक मेमरी, वायरलेस रोबॉटीक कार, इ. सारखे अनेक विषय संगणक क्षेत्रात रोज काम करणा-या व्यावसायिकांनाही माहित नसतात. पण MS-CIT पुस्तकात अशा विषयांची तोंडओळख करुन दिली आहे. विद्यार्थ्यांना याबद्दलची व अशा इतर अत्याधुनिक तंत्राची अधिक माहिती मिळविण्यास व इतरांबरोबर शेअर करण्यास प्रोत्साहन देता येईल ?

- MS-CIT प्रशिक्षक सीडी हा तर माहिती तंत्रज्ञानाची प्रॅक्टीकल बाजू शिकण्याचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा एक खजिनाच आहे. अलिबाबाच्या गुहेत आत आत जाताना व नवनवी संपत्ती बघता

बघता छोटा कासीम जसा हरखून जातो तितकाच उत्कट अनुभव विद्यार्थ्यांना ही सीडी बघताना घेता येईल. या अनुभवाची संधी आपण विद्यार्थ्यांना नियमितपणे आपल्या केंद्रात देऊ शकाल ? आपल्या केंद्रातील शिक्षकांनाही कासीम होऊन या गुहेत दर तीन महिन्यांनी प्रवेश करता येईल ?

- सीडी मधील लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमच्या सहाय्याने इंटरॅक्टीव्ह सेशन्स, प्रश्नमंजुषा, my notes, glossary, quiz इ. सुविधा वापरुन 'शिकायचे कसे' हेच शिकण्याची सवय आपल्या विद्यार्थ्यांना लावता येईल ? आगामी काळात सतत शिकत राहण्याशिवाय - आजन्म विद्यार्थी होण्याशिवाय - दुसरा पर्यायच नसल्यामुळे, विद्यार्थ्याला ही सवय लागणे महत्वाचे आहे असे आपल्याला वाटते ?

- आपल्या केंद्रातील या छोट्याशा eLearning सरावामुळे सतत शिकत रहाण्याची अपरिहार्यता आयुष्यभर एका निखळ आनंदात रुपांतरित होऊ शकते ही जाणीव आपण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू शकू ?

मित्रहो, हे व असे कितीतरी प्रश्न आपल्या सर्वांच्याच मनात आहेत. आपण प्रयत्न केल्यास यांची सकारात्मक उत्तरे मिळविणे अवघड नाही. असे केल्यास विद्यार्थ्यांनी आपल्यावर जो उदंड विश्वास दाखविला आहे त्याला आपण पात्र होऊ अन्यथा मोठ्या संख्येने आणि मोठ्या आशेने आपल्याकडे आलेले विद्यार्थी त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात निराश होऊन आपल्या केंद्राच्या प्रतिमेला व पर्यायाने आपल्या व्यवसायाला अपरिमित हानी पोहोचवू शकतील. आपल्या केंद्रातील विद्यार्थ्यांची 'न भूतो' अशी संख्या एक दुधारी शस्त्र आहे. हे आपण सर्व जाणताच. सूज्ञास अधिक सांगणे न लगे !

विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादाचे याही पेक्षा कित्येक पटींनी मोठ्या अशा संधीत रुपांतर करायला आपण सर्व एकजुटीने, नव्या ज्ञानाची कास धरत व आपल्या विद्यार्थ्यांप्रती असलेली आपली समर्पित भावना अधिक अर्थपूर्ण बनवत कटिबध्द होऊ या ! अजून खूप मोठी क्षेत्रे, खूप मोठी स्वप्ने, खूप मोठी ध्येये आपल्याला खुणावत आहेत !

MS-CIT केंद्र चालवणे ही एक कला आणि एक चान्स आहे! त्यासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा देऊन हे प्रश्नचिन्हांकित पत्र संपवितो.

आपला विश्वासू,



**विवेक सावंत**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित**